भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

# मुस्लिम व्यक्तिविषयक विधि (शरीअत) प्रयुक्ती अधिनियम, १९३७

( १९३७ चा अधिनियम क्रमांक ९६ )

( ३१ जुलै १९९७ रोजी यथाविद्यमान )

# THE MUSLIM PERSONAL LAW (SHARIAT) APPLICATION ACT, 1937

**(Act No. 96 of 1937)**

**( As in force on the 31st July 1997 )**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[ **किंमत :** रुपये ५.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जुलै १९९७ रोजी यथाविद्यमान असलेला दि मुस्लिम पर्सनल लॉ (शरीअत) ॲप्लिकेशन ॲक्ट, १९३७ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ८, अंक २, दिनांक २२ डिसेंबर १९९७ यात पृष्ठ ७० ते ७१ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक : २२ डिसेंबर १९९७.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Muslim Personal Law (Shariat) Application Act, 1937 as on the 31st July 1997 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India,* Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 8, dated 22nd December 1997 on pages 70 to 71.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (a) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

NEW DELHI,
Date : 22nd December 1997.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

# विशोधन अधिनियम व विधि-अनुकूलन आदेश यांची सूची

१ मुस्लिम व्यक्तिविषयक विधि (शरीअत) अधिनियम, १९४३ (१९४३ चा १६).

२ भारतीय स्वातंत्र्य (केंद्रीय विधिचे व अध्यादेशांचे अनुकूलन) आदेश, १९४८.

३ विधि-अनुकूलन आदेश, १९५०.

४ विधि-अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६.

५ संकीर्ण व्यक्तिविषयक विधि (विस्तार) अधिनियम, १९५९ (१९५९ चा ४८).

६ पाँडिचेरी (विधिचा विस्तार) अधिनियम, १९६८ (१९६८ चा २६).

(शा.म.मु.) एच ४१२५—२ (१०४०--७-२००४)

# मुस्लिम व्यक्तिविषयक विधि (शरीअत) प्रयुक्ती अधिनियम, १९३७

## कलमांचा क्रम


कलमे

१ संक्षिप्त नाव व विस्तार.

२ मुस्लिमांना व्यक्तिविषयक विधी लागू असणे.

३ अधिकथन करण्याची शक्ती.

४ नियम करण्याची शक्ती.

५ (निरसित).

६ निरसने.

# मुस्लिम व्यक्तिविषयक विधि (शरीअत) प्रयुक्ती अधिनियम, १९३७[१]

## (१९३७ चा अधिनियम २६)

(३१ जुलै १९९७ रोजी यथाविद्यमान)

[७ ऑक्टोबर १९३७]

[२]* * * मुस्लिमांना मुस्लिम व्यक्तिविषयक विधि (शरीअत) लागू करण्याबाबत उपबंध करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी [२]* * * मुस्लिमांना मुस्लिम व्यक्तिविषयक विधि (शरीअत) लागू करण्याचा उपबंध करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व विस्तार.

**१.** (१) या अधिनियमास "मुस्लिम व्यक्तिविषयक विधि (शरीअत) प्रयुक्ती अधिनियम, १९३७" असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार[३] [४][जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून,] [५]*** संपूर्ण भारतभर आहे.

मुस्लिमांना व्यक्तिविषयक विधी लागू असणे.

**२.** कोणतीही विरुद्ध रुढी किंवा परिपाठ असला तरीही, विनामृत्यूपत्र उत्तराधिकार, वारसाने मिळालेली अथवा संविदेखाली किंवा दानाखाली किंवा व्यक्तिविषयक विधीच्या अन्य कोणत्याही उपबंधाखाली मिळवलेली व्यक्तिगत संपत्ती धरून स्त्रियांची विशेष संपत्ती, विवाह, तलाक, इला, जिहार, लिआन, खुला आणि मुबारात धरून विवाहविच्छेद, निर्वाह, महर, पालकत्व, दाने, न्यास आणि न्यास संपत्ती आणि (धर्मादाय व धर्मादायी संस्था आणि धर्मादाय व धार्मिक दानविधी यांहून अन्य) वक्फ यांविषयीच्या सर्व प्रश्नांमध्ये (शेतजमिनीसंबंधीच्या प्रश्नांवाचून) जेथे पक्षकार मुस्लिम असतील, त्याप्रकरणी निर्णयाचा नियम मुस्लिम व्यक्तिविषयक विधी (शरीअत) असेल.

अधिकथन करण्याची शक्ती.

**३.** (१) जी कोणतीही व्यक्ती—

(क) आपण मुस्लिम आहोत, आणि

(ख) भारतीय संविदा अधिनियम, १८७२ (१८७२ चा ९) याच्या कलम ११ च्या अर्थांतर्गत आपण संविदा करण्यास सक्षम आहोत, आणि

(ग) [६][ज्या राज्यक्षेत्रांवर या अधिनियमाचा विस्तार आहे त्यांचे] आपण रहिवासी आहोत, असे विहित प्राधिकरणाचे समाधान करील अशी कोणतीही व्यक्ती तिने विहित नमुन्यात केलेल्या व विहित प्राधिकरणासमोर दाखल केलेल्या अधिकथनाद्वारे [७][या कलमाच्या उपबंधांचा] लाभ आपण मिळवू इच्छितो असे अधिकथित करू शकेल आणि त्यानंतर कलम २ चे उपबंध, त्यांत प्रगणित केलेल्या बाबींशिवाय आणखी दत्तक, मृत्युपत्रे आणि उत्तरदाने याही बाबी जणू काही विनिर्दिष्ट करण्यात आल्या असल्याप्रमाणे अधिकथनकर्त्याला व त्याच्या सर्व अज्ञान अपत्यांना व त्यांच्या वंशजांना लागू असतील.

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता पहा—भारताचे राजपत्र, १९३५, भाग पाचवा, पृष्ठ १३६ ; आणि निवड समितीच्या अहवालाकरिता पहा—भारताचे राजपत्र, १९३७, भाग पाचवा, पृष्ठ २३५.

या अधिनियमाचे विशोधन १९४९ चा मद्रास अधिनियम, १८ द्वारे मद्रासमध्ये करण्यात आले.

२. विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "भारताच्या प्रांतामधील" हे शब्द वगळण्यात आले.

३. १९६८ चा अधिनियम २६, कलम ३ आणि भाग पहिला यांद्वारे पाँडिचेरीवर पुढील आपरिवर्तनांसह विस्तारित करण्यात आला—

"परंतु, या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट पाँडिचेरी या संघ राज्यक्षेत्राच्या संत्यागींना (रेनान्कन्टसना) लागू होणार नाही.

४. संकीर्ण व्यक्तिविषयक विधी (विस्तार) अधिनियम, १९५९ (१९५९ चा ४८) कलम ३ व पहिली अनुसूची यांद्वारे विवक्षित शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ फेब्रुवारी १९६० रोजी व तेव्हापासून).

५. भारतीय स्वातंत्र्य (केंद्रीय विधीचे व अध्यादेशांचे अनुकूलन) आदेश, १९४८ याद्वारे "वायव्य सरहद्द प्रांत वगळून" हे शब्द वगळण्यात आले.

६. विधी अनुकूलन (क्र. ३) आदेश, १९५६ द्वारे "भाग क राज्याचे किंवा भाग ग राज्याचे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. १९४३ चा अधिनियम १६, कलम २ द्वारे "या अधिनियमाचा" या शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) पोटकलम (१) खालील अधिकथन स्वीकारण्यास जेथे विहित प्राधिकरण नकार देईल तेथे, ते करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला, राज्य शासन या संबंधात सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे नियुक्त करील अशा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल, आणि अपीलकर्ता असे अधिकथन करण्यास हक्कदार आहे असे अधिकाऱ्याचे समाधान झाले तर तो विहित प्राधिकरणाला ते स्वीकारण्याचा आदेश देऊ शकेल.

नियम करण्याची शक्ती.

**४.** (१) राज्य शासनाला या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या अशा :—

(क) या अधिनियमाखालील अधिकथने ज्याच्या समोर केली जातील ते प्राधिकरण व ज्यानुसार केली जातील तो नमुना विहित करणे ;

(ख) अधिकथने दाखल करण्यासाठी व या अधिनियमाखालील आपली कामे पार पाडताना कोणाही व्यक्तीच्या खाजगी निवासस्थानी उपस्थित राहण्यासाठी द्यावयाची फी विहित करणे ; आणि अशी फी ज्या ज्या वेळी द्यावी लागेल त्या वेळा व ती कशी वसूल केली जाईल ती रीत विहित करणे.

(३) या कलमाच्या उपबंधांखाली करण्यात आलेले नियम **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केले जातील आणि तद्नंतर जणू काही ते या अधिनियमात अधिनियमित केले असल्याप्रमाणे परिणामक असतील.

**५.** [विवक्षित परिस्थितीत न्यायालयाकडून विवाहविच्छेद] मुस्लिम विवाहविच्छेद अधिनियम, १९३९, कलम ६ द्वारे निरसित.

निरसने.

**६.** खाली उल्लेखिलेल्या अधिनियमांचे आणि विनियमांचे [१][खाली उल्लेखिलेले उपबंध] जेथवर ते या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत असतील तेथवर, निरसित होतील, ते असे :—

(१) १८२७ चा मुंबई विनियम चार याचे कलम २६ ;

(२) मद्रास दिवाणी न्यायालये अधिनियम, १८७३ (१८७३ चा ३) याचे कलम १६ ;

[२]* * * * *

(४) औंध विधी अधिनियम, १८७६ (१८७६ चा १८) याचे कलम ३ ;

(५) पंजाब विधी अधिनियम, १८७२ (१८७२ चा ४) याचे कलम ५ ;

(६) मध्य प्रांत विधी अधिनियम, १८७५ (१८७५ चा २०) याचे कलम ५ ; आणि

(७) अजमेर विधी विनियम, १८७७ (१८७७ चा विनियम ३) याचे कलम ४.

---

१. १९४३ चा अधिनियम १६, कलम ३ द्वारे "उपबंध" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे "(३) बंगाल, आग्रा व आसाम दिवाणी न्यायालये अधिनियम, १८८७ यांचे कलम ३७" हे शब्द, आकडे व कंस गाळण्यात आले. हे गाळल्यामुळे परिणामी त्या अधिनियमाचे कलम ३७ पुन्हा प्रवर्तित झाले आहे.

# THE MUSLIM PERSONAL LAW (SHARIAT) APPLICATION ACT, 1937

## मुस्लिम व्यक्तिविषयक विधि (शरीअत) प्रयुक्ती अधिनियम, १९३७

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| application | १. प्रयुक्ती | [short title] |
| | २. लागू करणे. | [long title] |
| charitable institution | धर्मादायी संस्था | [S. 2] |
| charities | धर्मादाय | [S. 2] |
| competent | सक्षम | [S. 3(d)] |
| contract | संविदा | [S. 2] |
| declarant | अधिकथनकर्ता | [S. 3(1)] |
| declaration | अधिकथन | [S. 3-Title] |
| dissolution | विच्छेद | [S. 2] |
| dissolution of marriage | विवाहविच्छेद | [S. 5] |
| dower | महर | [S. 2] |
| endowment | दाननिधी | [S. 2] |
| enumerate | प्रगणित करणे | [S. 3(1)] |
| expedient | समयोचित | [Preamble] |
| ila | इला | [S. 2] |
| intestate succession | विनामृत्युपत्र उत्तराधिकार | [S. 2] |
| khula | खुला | [S. 2] |
| legacy | उत्तरदान | [S. 3 (2)] |
| lian | लिआन | [S. 2] |
| maintenance | निर्वाह | [S. 2] |
| mubarat | मुबारात | [S. 2] |
| succession | उत्तराधिकार | [S. 2] |
| talaq | तलाक | [S. 2] |
| trust | न्यास | [S. 2] |
| usage | परिपाठ | [S. 2] |
| wakf | वक्फ् | [S. 2] |
| without prejudice to the generality of | च्या सर्वसाधारणतेला बाध न येता | [S. 4(2)] |
| zihar | जिहार | [S. 2] |

# मुस्लिम व्यक्तिविषयक विधि (शरीअत) प्रयुक्ती अधिनियम, १९३७

# THE MUSLIM PERSONAL LAW (SHARIAT) APPLICATION ACT, 1937

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिकथन | declaration | [क ३-शीर्षक] |
| अधिकथनकर्ता | declarant | [क. ३-१] |
| इला | ila | [क. २] |
| उत्तरदान | legacy | [क. ३(१)] |
| उत्तराधिकार | succession | [क. २] |
| खुला | khula | [क. २] |
| जिहार | zihar | [क. २] |
| तलाक | talaq | [क. २] |
| दाननिधी | enbowment | [क. २] |
| धर्मादाय | charities | [क. २] |
| धर्मादायी संस्था | charitable institution | [क. २] |
| निर्वाह | maintenance | [क. २] |
| न्यास | trust | [क. २] |
| परिपाठ | usage | [क. २] |
| प्रगणित करणे | enumerate | [क. ३(१)] |
| प्रयुक्ति | application | [संक्षिप्त नाव] |
| नहर | dower | [क. २] |
| मुबारात | mubarat | [क. २] |
| लागू करणे | application | [पूर्ण नाव] |
| लिआन | lian | [क. २] |
| वक्फ | wakf | [क. २] |
| विच्छेद | dissolution | [क. २] |
| विनामृत्युपत्र उत्तराधिकार | intestate succession | [क. २] |
| विवाहविच्छेद | dissolution of marriage | [क. ५] |
| संविदा | contract | [क. २] |
| समयोचित | expedient | [उद्देशिका] |
| च्या सर्वसाधारणतेला बाधा न येता | without prejudice to the generality of | [क. ४(२)] |
| सक्षम | competent | [क. ३(ख)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई